# चंद्राच्या प्रकाशासमवेत पुढे जात राहा

१ मार्च, २०१९

आत्मीय वाचकांनो,

गेल्या महिन्यात प्रेमाला तुम्ही प्राथमिकता कशी दिली असेल, याचा विचार जेव्हा मी करते, तेव्हा माझे मन मधुर सरप्राइझ् २०१९कडे वळते, ज्या समयी श्रीगुरुमाईंनी  आपल्याला सर्वांना एक अत्यंत सुंदर पोवळ्याच्या रंगाचे गुलाबाचे फूल भेट दिले होते. माझ्या असे लक्षात येते आहे की, आपण जसजसे या वर्षासाठी असलेल्या गुरुमाईंच्या संदेशाचे अध्ययन करतो आहोत, त्याचा अभ्यास करतो आहोत, त्याला आत्मसात करतो आहोत आणि तो अमलात आणतो आहोत, तसतसे आपण या वर्षाच्या प्रत्येक दिवसाला, प्रत्येक आठवड्याला, प्रत्येक महिन्याला सुवासिक गुलाबासारखे बनवत जात आहोत आणि ही सर्व गुलाबाची फूले एकत्र येत एका अत्यंत सुंदर हाराची रचना करत आहेत.

गुरुमाईंचा संदेशाप्रति तुमची समज अधिक विकसित करण्यासाठी आणि तो संदेश तुमच्या जीवनात लागू करण्यासाठी, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाईटवर तुमच्यासाठी एक दरवाजा उघडा आहे. या महिन्यात तुम्ही नियमितपणे वेबसाइट पाहत असताना, पुढील गोष्टी तुम्हाला दिसून येतील :

- ईशा सरदेसाई यांच्याद्वारे नवनवीन ‘कथा’, ज्या तुम्हाला एक माध्यम उपलब्ध करून देतील ज्याद्वारे तुम्ही श्रीगुरुमाईंच्या नववर्ष-संदेशाविषयी अधिक शिकू शकाल.
- मन आणि ‘मधुर सरप्राइझ् २०१९’च्या इतर विषय-वस्तूंवर असलेली शास्त्रग्रंथांमधील उद्धरणे, त्यांच्यावरील भाष्ये
- भारतातील संतकवींनी रचलेल्या भजनांचे, अभंगांचे आणि दोह्यांचे एक संकलन
- ‘गायत्री मंत्रावर भाष्य’, ज्यामध्ये गायत्री मंत्राचे पठण करून आपण त्या देवी किंवा देवतांचे आवाहन कसे करतो हे समजावले गेले आहे. या वर्षी आतापर्यंत, गुरुमाईंच्या नववर्ष-संदेशाचा अभ्यास करण्याचे एक साधन म्हणून तुम्ही भगवान कृष्ण आणि महासरस्वती यांना समर्पित गायत्री मंत्राचे श्रवण केले आहे, त्यांचे पठण केले आहे आणि त्यावर ध्यान केले आहे.
- ‘श्रीगुरुमाई के संदेश पर अभ्यास-पुस्तिका’ यामधील ‘अभ्यास-पत्र ६-९’

- या महिन्यासाठी असलेले ध्यान-सत्र, ज्याचे शीर्षक आहे ‘Take Hold of the Reins of the Mind’, जे प्रथम थेट ऑडिओ प्रसारणाद्वारे आणि नंतर वेबकास्टद्वारे उपलब्ध होईल
- ‘मधुर सरप्राइझ् २०१९’साठी असलेली ‘एक बार से अधिक प्रतिभागिता पैकेजस्.’ [Multiple Participation Packages] ‘मधुर सरप्राइझ्’मध्ये पुन्हापुन्हा भाग घेण्यामुळे तुम्हाला तुमच्या मनासमवेत काम करण्याच्या तुमच्या दृष्टिकोनाचे शुद्धीकरण करण्यासाठी, तुमच्या स्वतःच्या श्वासप्रश्वासाच्या दीप्तीमान तेजाला पुन्हा शोधण्यासाठी आणि तुमची साधना पुननवीन करण्यासाठी मदत मिळेल.

सिद्धयोग मार्गावर, मार्च हा महोत्सवांचा महिना आहे. त्यातील पहिला महोत्सव आहे महाशिवरात्री म्हणजे भगवान शिवाची महान रात्र, जो ४ मार्चला आहे. तुम्हाला या महोत्सवांविषयीची अधिक माहिती खालील पृष्ठांवर मिळू शकेल :

- संपूर्ण जगभरातून प्राप्त महाशिवरात्रीच्या चंद्राच्या तसबिरी Images of the crescent Mahashivaratri moon ज्या तुम्ही सर्व पाठवू शकता. ही एक अतिशय सुंदर परंपरा आहे जी श्रीगुरुमाईंनी वर्ष २०१५मध्ये प्रस्थापित केली होती, जेणेकरून सर्वांना भगवान शिवाच्या चंद्राचे पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालत असताना दर्शन घेता यावे.
- ‘महाशिवरात्री’च्या महिम्याचे वर्णन करणाऱ्या कथा.
- शास्त्रग्रंथांमधील उद्धरणे आणि स्तोत्रे जी भगवान शिवाची महती गातात.

याबरोबरच, या महिन्यात भारतातील लोक वसंतऋतूच्या निमित्ताने रंगांचा आनंददायी सण, होळीचा सण साजरा करतील. होळी हा दोन दिवसासाठी साजरा केला जाणारा सण आहे, ज्याचा आरंभ पौर्णिमेच्या दिवशी होईल आणि त्याची जोशपूर्ण व उल्लासपूर्ण सांगता दुसऱ्या दिवशी होईल. या वर्षी हा सण २० मार्चला आहे.

या पत्राची सांगता मी तुम्हा सर्वांना माझ्या सदिच्छा देऊन करेन ज्या मार्चच्या या महिन्यासाठी तुम्हा सर्वांसाठी आहेत. आणि त्या सदिच्छा या आहेत, त्या गहन मौनासमवेत पुढे जात राहा जे महाशिवरात्रीचे स्मरण केल्याने तुमच्या मनात उदित होते; त्या आनंदासमवेत आणि विनोदप्रियतेसमवेत पुढे जात राहा ज्यांना होळीचा सण आपल्यासोबत आणतो; उत्साह, दृढसंकल्प आणि अनंत संभावनेच्या त्या भावनेसह पुढे जात राहा जी तुम्हाला तेव्हा जाणवली होती जेव्हा

श्रीगुरुमाईंचा वर्ष २०१९चा संदेश तुम्हाला पहिल्यांदा प्राप्त झाला होता — आणि प्रत्येक वेळी तुम्ही त्यात एक नवीनता अनुभवता जेव्हा तुम्ही ‘मधुर सरप्राइझ्’मध्ये सहभागी होता.

अगली मुलाक़ात अगले महीने। हृदय को भक्ति से प्रदीप्त रखें।

हृदयाची एक न्यारीच रीत असते, ती शिकत राहा.

आदरपूर्वक,

गरिमा बोरवणकर

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.